# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 26.07.2024** **वारः शुक्रवार**

1. 25 व्या करगिल विजय दिवसानिमित्त आज पंतप्रधान नरेंद्र मोदी कारगिल युद्ध स्मारकाला भेट देणार
2. महाराष्ट्रात पुण्यासह अनेक जिल्ह्यात मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत, बहुतांश भागात आजही पावसाचा इशारा
3. श्रीलंकेतील राष्ट्रपती पदाची निवडणूक येत्या 21 सप्टेंबर रोजी होणार
4. महिलांच्या आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेतील उपांत्य फेरीत आज भारत आणि बांग्लादेशमध्ये लढत आणि
5. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचं आज औपचारिक उद्घाटन

**पंतप्रधान-करगिल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 25 व्या करगिल विजय दिवसानिमित्त करगिल युद्ध स्मारकाला भेट देणार आहेत. कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या जवानांना ते श्रद्धांजली अर्पण करणार आहेत. प्रत्येक भारतीयासाठी हा दिवस खूप विशेष आहे. देशाच्या रक्षणासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा हा दिवस आहे, असं त्यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. करगिल दिनानिमित्त आज देशभरात या युद्धात प्राणार्पण करणाऱ्या शूर जवानांना आदरांजली अर्पण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

लेहशी कोणत्याही हवामानात संपर्क कायम ठेवण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या, शिंकुनला बोगदा प्रकल्पाचं काम आज सुरू होणार असल्याची माहितीही पंतप्रधानांनी दिली. हा चार किलोमीटर लांबीचा ट्विन ट्यूब बोगदा निमू-पदुम-दारचा रस्त्यावर सुमारे पंधरा हजार 800 फूट उंचीवर बांधण्यात येत आहे. जगातील सर्वात उंच असलेल्या या बोगद्यामुळं सशस्त्र दलांना जलद हालचाल करणं शक्य होणार असून, लडाखमध्ये आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना देण्यासही मदत होणार आहे.

**नड्डा-करगिल दिवस**

करगिल युद्ध हे सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा संघर्ष होता. त्यात आपल्या सैनिकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पाकिस्तानविरुद्ध शौर्याने लढा दिला. भारतीय सैन्याच्या सामरिक कौशल्यामुळं करगिलच्या शिखरावर तिरंगा फडकवला गेला, असे गौरवोद्गार भाजपचे अध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्यमंत्री जे पी नड्डा यांनी काल नवी दिल्लीत मशाल रॅलीला संबोधित करताना काढले. यावेळी त्यांनी करगिल युद्धातील शूर सैनिकांना आदरांजली वाहिली. त्यांच्या हस्ते भारतीय सैन्याच्या कामगिरीची माहिती देणाऱ्या एका प्रदर्शनाचं उद्घाटन करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लष्करासाठी सीमेला जोडणारे दुपदरी रस्ते उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामुळं भारतीय लष्कर अरुणाचल प्रदेश ते लडाखपर्यंत दीड दिवसात पोहोचू शकतं, असंही त्यांनी सांगितलं.

**अर्थसंकल्प चर्चा**

संसदेत आजही केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा सुरू राहणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजचा पाचवा दिवस आहे. लोकसभेत काल केंद्रीय अर्थसंकल्पावरील चर्चेत काँग्रेसचे चरणजित सिंह चन्नी यांनी या अर्थसंकल्पानं लोकांची निराशा केल्याचा आरोप केला. या अर्थसंकल्पात पंजाबला सावत्र वागणूक देण्यात आली असून पुरामुळे प्रभावित झालेल्या पंजाबमधील नागरिकांसाठी या अर्थसंकल्पात काहीही तरतूद नाही, असा आरोपही त्यांनी केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संसद भवनातील पुतळ्याच्या स्थलांतरावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. चन्नी यांनी केलेल्या काही वक्तव्यांवरून काँग्रेस खासदार आणि सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांमध्ये खडाजंगी झाली.

**चीन**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांची लाओस इथं भेट घेतली. यावेळी दोन्ही देशातील द्विपक्षीय संबंधांबद्दल चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. भारत-चीन सीमेवरील स्थितीचं

प्रतिबिंब दोन्ही देशांच्या संबंधांत दिसून येईल. सीमेवरील सैन्य माघारी घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत दोन्ही देश सहमत असून, वास्तविक नियंत्रण रेषा आणि मागील करारांचा आदर करणं आवश्यक आहे, असंही डॉ जयशंकर यांनी म्हटलं आहे.

**<u>शाह-ईशान्य आदिवासी</u>**

ईशान्येकडील राज्यांतल्या आदिवासींच्या समस्यांचं समाधान आणि निराकरण करण्यात येईल तसंच त्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येईल असं आश्वासन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ईशान्येकडील राज्यांतल्या आदिवासी नेत्यांना दिलं आहे. ईशान्येकडील राज्यांतील अनेक आदिवासी नेत्यांनी काल नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्र्यांसोबत बैठक घेतली आणि तिथल्या आदिवासींना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांवर चर्चा केली. राज्यघटनेच्या 6 व्या अनुसूची अंतर्गत स्थापन झालेल्या 10 आदिवासी स्वायत्त जिल्हा परिषदांना, अधिक घटनात्मक अधिकार प्रदान करणारं 125 वी घटनादुरुस्ती विधेयक संसदेत मंजूर कारण्यात यावं अशी प्रमुख मागणी करण्यात येत आहे. 10 आदिवासी स्वायत्त जिल्हा परिषदांपैकी आसाम, मिझोराम आणि मेघालयमध्ये प्रत्येकी तीन जिल्हे असून एक त्रिपुरातील आहे.

**<u>पाऊस</u>**

महाराष्ट्रात पुणे, मुंबई, ठाण्यासह इतरही अनेक जिल्ह्यात काल पावसाचा जोर होता. पुणे शहर आणि परिसरात मुसळधार पाऊस आणि धरणातून सुरू असलेला विसर्ग यामुळं काल शहरातील काही भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. अनेक जिल्ह्यातील नद्यांना पूर आले असून, अनेक ठिकाणी नागरी वस्तीत पाणी शिरलं आहे. त्यामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक गावांचा संपर्क तुटला असून, राष्ट्रीय महामार्गांवरील वाहतूकही प्रभावित झाली आहे. अनेक ठिकाणी पुरामुळं नागरिकांचं सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आलं आहे. ठिकठिकाणी राज्य आपत्ती निवारण दलाची पथकं तैनात करण्यात आली आहेत. सातारा जिल्ह्यातील कोयना आणि कण्हेर धरणातील पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी नदीपात्रात पाणी सोडण्यात येत आहे. कोयना धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवल्यास सांगलीला पूराचा धोका उदभवण्याची शक्यता आहे. कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, गडचिरोली, चंद्रपूर, लातूर आदी जिल्ह्यांतही पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, राज्याच्या बहुतांश भागात आजही पावसाची शक्यता असून कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. या पार्श्र्वभूमीवर पुणे, ठाणे, नवी मुंबईसह विविध जिल्ह्यात शाळा-महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

**<u>श्रीलंका-राष्ट्रपती निवडणूक</u>**

श्रीलंकेतील राष्ट्रपती पदाची निवडणूक येत्या 21 सप्टेंबर रोजी होणार आहे. श्रीलंकेच्या निवडणूक आयोगानं एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. यासाठीचे अर्ज 15 ऑगस्ट रोजी स्वीकारण्यात येतील असं आयोगाने या पत्रकात म्हंटलं आहे. या आधीची राष्ट्रपतीपदाची निवडणूक 2018 झाली होती, ज्यात गोताबाया राजेपक्षे विक्रमी पांच लाख मताधिक्याने विजयी झाले होते, मात्र 2022 मध्ये देशात उद्भवलेल्या आर्थिक आणि राजकीय संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांना राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर रनिल विक्रमसिंघे यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. विक्रमसिंघे यांचा कार्यकाल 17 नोव्हेंबर रोजी संपत आहे.

**<u>भाजप- राज्यप्रमुख</u>**

भारतीय जनता पक्षानं बिहार आणि राजस्थानसाठी नवीन पक्षप्रमुखांची नियुक्ती केली आहे. दिलीप जयस्वाल हे बिहार भाजपचे अध्यक्ष असतील, तर राजस्थानमध्ये राज्यसभा सदस्य मदन राठोड यांची भाजपच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षानं सहा राज्यांसाठी प्रभारीही नियुक्त केले आहेत. त्यात आसामसाठी हरीश द्विवेदी, चंदिगडसाठी खासदार अतुल गर्ग, लक्षद्वीप आणि तामिळनाडूसाठी अरविंद मेनन, राजस्थानसाठी राधामोहन दास अग्रवाल आणि त्रिपुरासाठी डॉ. राजदीप रॉय यांचा समावेश आहे. विजया रहाटकर राजस्थानच्या, तर सुधाकर रेड्डी तामिळनाडूचे सहप्रभारी असतील.

**<u>केरळ-निपाह व्हायरस</u>**

केरळमध्ये निपाह विषाणूचा फैलाव झाला असून, काल मांजेरी आणि कोझिकोड इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात दोन रुग्णांना दाखल करण्यात आलं आहे. त्यामुळे या दोन्ही रुग्णालयांमध्ये दाखल असलेल्या रुग्णांची एकंदर संख्या आठ झाली आहे. गेल्या रविवारी निपाह विषाणूमुळे बळी गेलेल्या 14 वर्षांच्या मुलाच्या संपर्कात आलेल्या आठ जणांना बाधा झाली नसल्याचं आढळून आलं आहे, असं केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी सांगितलं. पंडिक्कड आणि अनक्क्यम पंचायतींमध्ये आरोग्य अधिकाऱ्यांनी केलेल्या सर्वेक्षणात आतापर्यंत 27 हजार 900 हून अधिक कुटुंबांचा समावेश करण्यात आला असल्याची माहिती आरोग्य विभागानं दिली आहे.

**महिला क्रिकेट-आशिया चषक**

श्रीलंकेत सुरू असलेल्या महिलांच्या टी-20 आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतील उपांत्य फेरीतील सामना आज भारत आणि बांग्लादेश दरम्यान दंबूला इथं खेळला जाणार आहे. या स्पर्धेत भारतानं आतापर्यन्त सगळे सामने जिंकले आहेत. ही स्पर्धा जिंकल्यास भारत चौथ्यांदा या चषकाचा मानकरी ठरणार आहे.

**पॅरिस ऑलिंपिक**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेला आजपासून पॅरिसमध्ये आरंभ होत आहे. रिव्हर शिन इथं भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री 11 वाजता स्पर्धेचा औपचारिक उद्घाटन समारंभ होणार आहे. स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच उद्घाटन समारंभ मैदानाच्या बाहेर होत असून, विविध सहभागी देशांतील खेळाडूंचं संचलनही मैदानाबाहेर होणार आहे. अंदाजे 10 हजार 500 खेळाडू संचलनात सहभागी होणार असून, त्यांना घेऊन जाण्यासाठी अंदाजे शंभर बोटींची व्यवस्था करण्यात आली आहे. आयफेल टॉवर जवळील एस्प्लेनेड इथे संचलन समाप्ती होऊन ऑलिंपिक ज्योत पूज्वलित केली जाईल. या संचलनात भारतीय खेळाडू पारंपरिक भारतीय पोषाखात सहभागी होणार असून भारतीय पथकाचं नेतृत्व शरथ कमाल आणि पी. व्ही. सिंधु करणार आहेत. तत्पूर्वी या स्पर्धेला सुरुवात होण्याच्या एक दिवस आधीच तिरंदाजीमध्ये भारतीय महिला आणि पुरुष संघानं मानांकन फेरीत दमदार कामगिरी करत उपांत्यपूर्व फेरीतलं आपलं स्थान निश्चित केलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.

#